नियमीत फौजदारी खटला क्र. **२४६/२०१७**
निशाणी क्र. **५९/क**

**<u>फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४४ अन्वये दोषारोपापूर्वीचा पुरावा</u>**

**फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०४ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **वैजयंती सुभाष पाटील** |
| वय सुमारे | : | ५९ वर्षे, व्यवसाय : शेती |
| निवासस्थान | : | मु. रावे, ता. पेण, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी. एस्. पाटील यांचेमार्फत</u>:**

०१. मी रावे येथे ग्रामपंचायत निवडणुकीसाठी उभी होते. माझ्या विरोधात नुतन दिलीप थोरवे ह्या उभ्या होत्या. सदर निवडणुकीत माझा पराभव झाला व नुतन थोरवे विजयी झाल्या. मला तिच्यावर संशय आला की, तिने खोटे कागदपत्र गोळा केले असावेत. मी संशयाच्या अनुषंगाने तिच्या गावी म्हणजे कर्जत येथे गेले. तिची जात मराठा होती. तिने मराठा कुणबी अशी जात दाखवली होती. आम्ही कर्जत येथील तिच्या गावी चौकशी केली. मी तिच्या शाळेचा दाखला काढला. तिच्या दाखल्यामध्ये मराठा अशी जात नमूद होती. त्यानंतर मी उच्च न्यायालयाकडे अर्ज दिला होता. मा. उच्च न्यायालयात माझ्या बाजूने निकाल दिला होता. मी चौकशी समितीकडे देखील अर्ज दिला होता. आता मला मी जात पडताळणी समितीकडे दिलेल्या अर्जाची व्हेरीफाईड प्रत दाखवण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ६०** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. विद्देश गोंदकर यांचेमार्फत</u>** :

उलटतपास दोषारोप निश्चित होईपर्यंत तहकूब करण्यात आला.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **१३/०४/२०२६**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.